# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२११०/ १८८

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : secretary@msbte.com


जा.क्र. मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.२०/२०२०/ ०६१ दि. 14 SEP 2020

**महत्वाचे परिपत्रक (गोपनीय)**

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था.

**विषय :- अंतिम सत्र / वर्षातील विद्यार्थ्यांच्या असैधांतिक (Non-Theory) विषयांच्या परीक्षेबाबत...**

संदर्भ :- १. मंडळाचे महत्त्वाचे परिपत्रक मरातंशिमं/का-२०/परीक्षा-२०२०/८३, दि. १५/०५/२०२०

२.मंडळाचे महत्त्वाचे परिपत्रक मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.२०/२०२०/५९,दि. १०/०९/२०२०

३.मंडळाचे महत्त्वाचे परिपत्रक मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.२०/२०२०/५७,दि. ०९/०९/२०२०

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये अंतिम सत्र / वर्षातील विद्यार्थ्यांच्या परिक्षेबाबत कळविण्यात आले असून प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याकरिता महत्वाच्या सुचना या परीपत्रकाद्वारे आपणांस देण्यात येत आहेत.

**१. परीक्षेचे ओळखपत्र ( Hall Ticket ) :-**

उन्हाळी परीक्षा २०२० करीता लेखी परिक्षा अर्ज निश्चित केलेल्या अंतिम सत्र/ वर्ष विद्यार्थ्यांच्या परीक्षा, मंडळ स्तरावर व संस्था स्तरावर ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने विद्यार्थी प्रवेशित संस्था यांना परीक्षा केंद्र घोषीत करण्यात येत आहे. सदर विद्यार्थ्यांचे सुधारीत ओळखपत्र ( Hall Ticket ) मंडळाचे संकेतस्थळावर तसेच Institute Login मध्ये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. संस्थांनी Institute Login मध्ये उपलब्ध असलेले ओळखपत्र बरोबर आहे, याची खात्री करुन घ्यावी.

**२. सिटींग चार्ट :-**

उन्हाळी परीक्षा २०२० करीता ॲपिअर होणा-या विद्यार्थ्याचे सिटींग चार्ट संस्थेच्या Institute Login मध्ये उपलब्ध आहेत. त्यातील अंतिम सत्र / वर्षातील परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांच्या Status नुसार दुरूस्ती आवश्यक असल्यास संबंधीत संस्थेने सदर दुरुस्ती करुन आवश्यक शेरे व संबंधीत दुरुस्तीकरिता आवश्यक कागदपत्रे जोडुन विभागीय कार्यालयामार्फत दुरुस्ती करुन घ्यावी.

| अ.क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| ०१. | संस्थांनी सिटींग चार्टमध्ये आवश्यक असलेली दुरूस्ती करुन कागदपत्रे जोडून विभागीय कार्यालयामार्फत निश्चित करण्याची अंतिम तारीख | दि. २३.०९.२०२० |
| ०२. | विभागीय कार्यालयाने आपल्या अंतर्गत असलेल्या सर्व संस्थांनी केलेली दुरुस्ती व कागदपत्रे तपासून निश्चित करण्याची अंतिम तारीख | दि. २४.०९.२०२० |

**३. असैधांतिक परीक्षा (Non Theory Examination) :-**

A. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र) तसंच शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील अंतिम सत्र / वर्ष विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा मंडळाचे महत्त्वाचे परीपत्रक

संदर्भ क्र. २ नुसार नमूद केलेल्या मुद्दा क्र. १ प्रमाणे घ्यावी. तसेच संबंधित विषयाच्या Teaching Examination Scheme मध्ये नमूद Maximum Marks करीता प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा घेण्यात यावी.

**B. विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरतांना निवडलेल्या चुकीच्या Optional / Elective विषयाबाबत कार्यवाही-**

१) सदर विद्यार्थ्याचा योग्य असलेला Optional विषय निवडून संस्थेच्या सिटींग चार्ट मध्ये दुरूस्ती करुन विभागीय कार्यालयामार्फत निश्चिती करावी.

२) प्रात्यक्षिक परीक्षेच्या चुकीच्या Optional विषयाच्या E-marksheet मध्ये सदर विद्यार्थ्याच्या आसनक्रमांकासमोर स्पेशल कोड ४०७ देण्यात यावा.

३) योग्य असलेल्या Optional विषयाकरिता मॅन्युअल मार्कशीट तयार करुन गुण भरण्यात यावेत.

४) संस्थांनी योग्य असलेला Optioanl विषय खालील नमुद Format मध्ये संस्थेच्या लेटर हेडवर प्राचार्यांच्या स्वाक्षरीने प्रश्नपत्रिका विभाग Desk42@msbte.com व संबंधित विभागीय कार्यालयास Scan Copy व Excel Sheet ईमेल द्वारे २४.०९.२०२० पर्यंत पाठवावी.

| Sr. No. | Enrollment No. | Course Year Master | Seat No. S-2020 Exam | Correct optional paper code | Subject Name |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**C. Non-Theory परीक्षेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे-**

| Sr. No. | Activity | Period |
|---|---|---|
| 1. | Non Theory Login ID & Passwords by mail to Principals | 13 September, 2020 |
| 2. | Conduction of Practical / Oral Examination for final semester / year student for AICTE and Non-AICTE Courses | 15 – 25 September, 2020 |
| 3. | Filling & Confirmation of E- Marksheets by Examiner | 15 – 25 September, 2020 |
| 4. | HOD confirmation of E marksheet | 25 September, 2020 |
| 5. | Conduction of Theory/ Practical/ Oral Examination of Backlog Courses of final semester / year student | 25 September – 04 October, 2020 |
| 6. | Filling & Confirmation of E- Marksheets for Backlog Courses by Examiner | 25 September – 04 October, 2020 |
| 7. | HOD confirmation of E marksheet for Backlog Courses | 04 October, 2020 |

**D. Non- Theory E-Marksheet भरतांना खालील महत्वाच्या सुचनांचे पालन करावे-**

१. नियमित विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण दि. १३/०३/२०२० पर्यंतच्या कालावधीत विद्यार्थ्याने पूर्ण केलेल्या सत्रकर्म व त्या अनुषंगाने झालेले मुल्यांकन या आधारावर देण्यात यावे.

२. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील सम सत्रातील द्वितीय चाचणी परीक्षा व औषधनिर्माण शास्त्र अभ्यासक्रमाची तिसरी चाचणी परीक्षा कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे घेता आली नाही. विद्यार्थी चाचणी परीक्षेकरिता गैरहजर असल्यास अशा विद्यार्थ्यांना संबंधित विषयाचे सत्रकर्म/निरंतर गुणमुल्यांकनाआधारे गुण देण्यात यावे व संदर्भ क्र. १ मधील मुद्या क्र. ३ नुसार SW/PA/TM चे गुणमुल्यांकन करावे.

३. सर्व प्रथम परिक्षकांनी मंडळाने निर्देशित केलेल्या Proforma मध्ये उदा. D3, D4, D5 Or as applicable विद्यार्थ्याच्या उन्हाळी परीक्षांच्या आसनक्रमांकानुसार गुण भरणे आवश्यक आहे.

४. विभागप्रमुख यांनी परीक्षकांनी तयार केलेले Proforma मधील गुण तपासतांना विषयाच्या Min / Max गुण व Teaching Scheme नुसार रुपांतरीत केलेले गूण बरोबर आहे किंवा नाही याची खात्री करुन सदर Proforma वर स्वाक्षरी करावी.

५. परीक्षकांनी संबंधीत विषयाची E- Marksheet भरतांना Proforma मधील Min / Max गुण व E- Marksheet वरील Min / Max गुण बरोबर आहेत याची खात्री करुन अचुकतेने विद्यार्थ्यांच्या आसनक्रमांकानुसार गुण भरावेत.
६. उन्हाळी परीक्षा २०२० पासुन परीक्षकाने E- Marksheet मध्ये गुण भरल्यानंतर Check Print काढणे आवश्यक राहील. सर्व परीक्षकांनी Check Print काढुन गुणपत्रिकेतील विद्यार्थ्यांचे आसन क्रमांकानुसार Proforma मधील गुण व गुणपत्रिकेतील गुण तपासुन Check Print वर परीक्षक व विभागप्रमुख यांनी स्वाक्षरी करावी.
७. Check Print तपासतांना गुणांमधील तफावत असल्यास गुणपत्रिका Confirm करणे अगोदर संबंधित परीक्षकांनी गुणदुरुस्ती करावी व पुन्हा Check Print काढुन गुण तपासावे.
८. Check Print मधील गुण बरोबर असल्यास परीक्षकांनी गुणपत्रिका Confirm करावी व त्याची प्रिंट काढावी.
९. परीक्षकांनी Confirm केलेल्या Marksheet लिफाफ्यात सिलबंद कराव्यात व मंडळाच्या नियमावलीनुसार जतन करण्यात याव्यात.
१०. परीक्षकांनी गुणपत्रिका Confirm केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये दुरुस्ती करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

E. Teaching Examination Scheme नुसार ज्या विषयाकरीता बाह्य परीक्षकाची नेमणूक आवश्यक आहे, अशा विषयाकरिता संबंधित अभ्यासक्रमातील त्याच संस्थेतील अध्यापकांची बाह्य परीक्षक म्हणून संस्थास्तरावर नेमणूक करण्यात यावी.

F. संदर्भ क्र. ०३ च्या परिपत्रकानुसार अंतीम सत्र/ वर्षातील विद्यार्थ्यांकरीता परीक्षा अर्ज भरण्याची विशेष संधी देण्यात आली होती. विभागीय कार्यालयाने निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांचं परीक्षा अर्जानुसार आसन क्रमांक देण्यात येतील तसेच Non-Theory विषयांच्या e-marksheet दि. १७.०९.२०२० रोजी Non-Theory Login मध्ये देण्यात येतील. तरी सदर विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा घेऊन नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करावी.

तरी संस्थेच्या प्राचार्यांनी वरील सर्व सुचना आपल्या संस्थेतील सर्व विभागप्रमुख तसेच परीक्षा आयोजनाबाबत सर्व संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना द्याव्यात. तसेच परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांची राहील, याची नोंद घ्यावी.

(वि. र. जाधव)
प्र. सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत :-

उपसचिव, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपुर, औरंगाबाद यांना माहितीकरिता व आवश्यक कार्यवाहीकरिता.